वागळे वाहतूक विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in



जा.क. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २४७ /२०२६ दि. २६/११/२०२६

—: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

ज्याअर्थी, ठाणे महानगरपालिका क्षेत्रामध्ये **कासारवडवली, कापुरबावडी** व **वागळे** वाहतूक उपविभागाचे हद्दीत **लोकमत मिडीया प्रा. लि.** यांचे वतीने आरोग्याविषयी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी या हेतूने दि.२९/११/२०२६ रोजी सकाळी ०५:०० ते १०:३० वाजेपावेतो **'लोकमत महामॅरेथॉन'** चे आयोजन करण्यात आलेले आहे. या स्पर्धेमध्ये बहुसंख्य स्पर्धक भाग घेणार असून स्पर्धा पाहण्यासाठी मोठया प्रमाणात प्रेक्षकांची गर्दी होते. त्यामुळे स्पर्धेच्या कालावधीत सदर परिसरात वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

त्याअर्थी, मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

१) कासारवडवली वाहतूक उप विभाग :—

प्रवेश बंद –	१) बिरसा मुंडा चौकातून पवारनगर कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसा मुंडा** चौक येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	बिरसा मुंडा चौकातून पवारनगर कडे जाणाऱ्या वाहनांसाठी पवारनगर कडून बिरसा मुंडा नौकाकडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) वसंत विहार चौक कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे जाणा–या सर्व प्रकारच्या वाहनांना **वसंत विहार चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	वसंत विहार चौकातून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे जाणाऱ्या वाहनांसाठी डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडून वसंत विहार चौक कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	३) डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडून खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **डॉ. काशिनाथ घाणेकर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	डॉ. काशिनाथ घाणेकर चौकातून खेवरा सर्कल कडे जाणाऱ्या वाहनांसाठी खेवरा सर्कल कडून डॉ. काशिनाथ घाणेकर चौक कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	४) खेवरा सर्कल कडून टिकुजीनीवाडी सर्कल कडे जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **खेवरा सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	खेवरा सर्कल कडून टिकुजीनीवाडी कडे जाणाऱ्या वाहनांसाठी टिकुजीनीवाडी सर्कल कडून खेवरा सर्कल कडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून वरील वाहने इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	५) टिकुजिनीवाडी कडुन मुल्ला बाग निळकंठ ग्रीन बी च्या दिशेने जाणाऱ्या वाहिनीवर सर्व प्रकारच्या वाहनांना **टिकुजिनीवाडी सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदर वाहने ही मुल्ला बाग मुल्ला बाग निळकंठ ग्रीन बी कडुन टिकुजिनीवाडी सर्कलच्या दिशेने येणारी वाहीनी दुहेरी करण्यात येत असुन सदर वाहीनीवरुन इच्छीत स्थळी जातील.

२) कापुरबावडी वाहतूक उप विभाग :—

प्रवेश बंद –	१) बिरसा मुंडा चौकातून पोखरण रोड नंबर ०२ वरून हनुमान मंदिर सर्कल मार्गे गांधीनगर कडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **बिरसामुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरचे मार्गावरून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गांधीनगर पोखरण रोड नंबर ०२ हनुमान मदिर सर्कल मार्गे बिरसामुंडा चौकाकडे येणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) गांधीनगर चौकातून ग्लॅडी अल्वारिस रोड मार्गे डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाकडे जाणारे सर्व प्रकारच्या वाहनांना **गांधीनगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरचे मार्गावरून जाणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना गांधीनगर चौकातून डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकाकडे जाणारी वाहिनी दुहेरी करण्यात येत असून सदर वाहिनीवरून इच्छीत स्थळी जातील.

३) वागळे वाहतूक उप विभाग :–

प्रवेश बंद –	**१)** येऊर गेट – देवदयानगर परीसर – बिरसामुंडा चौकातुन – शास्त्रीनगर–वर्तकनगर कडुन रेमंड कंपनी मार्गे – कॅडबरी जंक्शनकडे येणाऱ्या रोडवरील सर्व प्रकारच्या वाहनांना **येऊर गेट, देवदयानगर चौक, बिरसामुंडा चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	सदरची वाहने ही कॅडबरी जंक्शनकडुन – वर्तकनगर मार्गे – येऊर गेट कडे जाणाऱ्या वाहीनीवरील तीन लेन पैकी एका लेनवरून येऊर गेट, उपवन तलावकडुन कॅडबरी जंक्शनकडे येऊन इच्छीत स्थळी जातील.
प्रवेश बंद –	२) देवदयानगर – शिवाईनगर – बिरसामुंडा चौककडुन देवदयानगर चौकातुन शास्त्रीनगरकडे येणाऱ्या सर्व प्रकारच्या वाहनांना **देवदयानगर चौक** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत आहे.
पर्यायी मार्ग –	**अ)** देवदयानगर– शिवाई नगर– परीसरातील वाहने ही – बिरसामुंडा चौक – वेथनी हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.
पर्यायी मार्ग –	**ब)** येऊर गेट कडुन येणारी सर्व वाहतुक ही उपवन तलाव – पायलादेवी मंदिर – बिरसामुंडा चौक – वेथनी हॉस्पीटल मार्गे पुढे इच्छीत स्थळी जातील.

सदर वाहतूक अधिसूचना दि.२९/११/२०२६ रोजी सकाळी ०५:०० ते १०:३० वाजेपावेतो अंमलात राहील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रुग्णवाहिका, ग्रीन कॉरीडोर, ऑक्सीजन गॅस वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू राहणार नाही.

(पंकज शिरसाट)
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर.

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.
२/– सदरची अधिसुचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

प्रत माहितीसाठी सादर,

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर
मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर
मा. अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, ठाणे शहर
मा. जिल्हाधिकारी, ठाणे
मा. आयुक्त, ठाणे महानगरपालिका, ठाणे.
मा. पोलीस उप आयुक्त, परिमंडळ – १ व ५/वि.शा. ठाणे

प्रत कार्यवाहीसाठी :–

प्रादेशिक परिवहन अधिकारी, ठाणे.
परिवहन व्यवस्थापक, ठाणे.
नियंत्रण कक्ष अधिकारी, ठाणे

प्रत :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर
२/– सदरची अधिसुचना नागरिकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

प्रत :– समन्वय अधिकारी, ९ ए. एस. कक्ष, ठाणे
२/– सदरची अधिसुचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी.

प्रत :– संबंधित सपोआ, वाहतूक विभाग, ठाणे शहर व संबंधित प्रभारी अधिकारी, वाहतूक उपविभाग, ठाणे शहर.
२/– म.न.पा.ठाणे च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सुचना फलक लावून घ्यावीत.